।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in

email : directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा विभाग/वाणिज्य/२०२२-२३/१३३ दिनांक : २९/०४/२०२३

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत वाणिज्य महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : वाणिज्य विद्याशाखेतील पदवी जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षेच्या संधी देणे बाबत.....**

**संदर्भ** : १) शैक्षणिक-०१/परिपत्रक/पदवी-सीबीसीएस अभ्यासक्रम/२०१९-२०/११३९, दिनांक ३०/०८/२०१९.
२) शैक्षणिक-०१/परिपत्रक पदवी-पदव्युत्तर-सीबीसीएस अभ्यासक्रम/२०२०-२१/४१०, दिनांक २८/०७/२०२०.
३) शैक्षणिक-०१/परिपत्रक पदवी /वाणिज्य व व्यवसस्थापन-२०२१-२२/८०, दिनांक २३/०७/२०२१.
४) परीक्षा/वाणिज्य/२०२१-२२/८७९, दिनांक १०/१२/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भ क्रमांक १ नुसार वाणिज्य **पदवी बी.कॉम प्रथम वर्ष त्यानंतर संदर्भ क्रमांक २ नुसार बी.कॉम द्वितीयवर्ष तसेच संदर्भ क्रमांक ३ नुसार बी.कॉम.तृतीयवर्ष वर्गासाठी (सी.बी.सी.एस. ) सुधारीत अभ्यासक्रम लागू करण्यांत आलेला आहे.** त्यामुळे वाणिज्य पदवी अभ्यासक्रमातील जुना अभ्यासक्रम जो शैक्षणिक वर्ष २०१६-१७ प्रथम वर्ष, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ द्वितीय वर्ष तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ तृतीय वर्ष यावर्षी लागू झालेला होता त्या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेच्या ३ संधी त्या त्या वर्षी देण्यांत आलेल्या आहेत. त्यानंतरही जे विद्यार्थी जुन्या अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण होते त्यांना उत्तीर्ण होण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१९ व २०२० पासून अनुक्रमे प्रथम व द्वितीय वर्षासाठी लागू झालेल्या नवीन सिबीसिएस अभ्यासक्रमातील विषय हे समकक्ष विषय म्हणून संदर्भ क्रमांक ४ च्या पत्राप्रमाणे देण्यांत आलेले आहेत. **संदर्भ क्रमांक ४ नुसार देण्यांत आलेली समकक्षता ही संदर्भ क्रमांक १, २ व ३ नुसार सुधारीत झालेले अभ्यासक्रम अस्तीत्वात असे पर्यंतच लागू राहतील.** त्यानंतर मात्र शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून लागू असलेल्या अभ्यासक्रमातील विद्यार्थी अजूनही एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण असतील तर त्यांना संदर्भ क्रमांक १, २ व ३ नुसार सुधारीत झालेले **अभ्यासक्रम बदलल्यानंतर जो कोणता अभ्यासक्रम लागू होईल त्या अभ्यासक्रमातील त्या-त्या वर्गातील अंतर्गत, एस.ई.सी.प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट व ईतर जे विषय असतील असे सर्व विषय घेवून पुन्हा परीक्षा द्यावी लागेल.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षी लागू झालेल्या तृतीय वर्ष वर्गाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुधारीत झाल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची शेवटची संधी उन्हाळी-२०२३ ही परीक्षा असल्याबाबतच्या सूचना वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या वाणिज्य अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या वेळापत्रकात देण्यांत आलेल्या

....२..

।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

**Phone: (02462) 215294** **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**

**email : directorboee@srtmun.ac.in**




होत्या. त्यानुसार परीक्षेच्या संधी संपल्यामुळे अद्यापही तृतीय वर्ष वर्गातील काही विद्यार्थी एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण असतील तर त्यांना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सूधारीत झालेल्या तृतीय वर्ष वर्गातील विषय हे समकक्ष विषय म्हणून देण्याची कार्यवाही चालू आहे. त्याबाबत लवकरच परिपत्रक प्रसिध्द करण्यांत येईल.

वरील प्रमाणेची माहिती विद्यार्थ्यांना व सर्व संबंधितांना अवगत करून देण्यांत यावी. जेणे करून परीक्षा आवेदनपत्र भरतांना चूका होणार नाहीत.

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

याची एक प्रत :

१) मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे, प्रस्तुत विद्यापीठ.
४) सहा.कुलसचिव, शैक्षणिक विभाग (अभ्यासमंडळ), प्रस्तुत विद्यापीठ.